**Publication: Pune Satta** **Date: Wednesday, 11th March, 2015**

**Edition: Pune**

XAT.COM

# इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्सच्या नवीन एमडी व सीईओ आर. एम. विशाखा बीएफएसआय क्षेत्रामध्ये २५ वर्षांचा एक संपन्न अनुभव

मुंबई : सीनिअर बीएफएसआय प्रोफेशनल श्रीमती आर. एम. विशाखा आा इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्सच्या नवीन व्यवस्थापकीय संचालिका व सीईओ म्हणून पदभार स्विकारणार आहेत.

श्रीमती विशाखा यांनी आर्थिक सेवा उद्योगामध्ये २५ वर्षांपेक्षा अधिक काळाचा एक यशस्वी ट्रॅक रेकॉर्ड संपादित केला आहे. याअगोदर, त्या एका प्रमुख बॅन्काश्युरन्स संचालित लाईफ इन्शुरन्स कंपनीमध्ये सेल्स व मार्केटिंग, संचालिका म्हणून कार्यरत होत्या. तसेच, त्यापूर्वी श्रीमती विशाखा इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्समध्ये चीफ बिझनेस ऑफिसर म्हणून कार्यरत होत्या.

श्रीमती विशाखा यांच्या मागील पदभारांमध्ये सार्वजनिक तसेच खाजगी कंपन्यांमधील एका संपन्न अनुभवाचा समावेश आहे, जो एका नवीन प्रारंभाचा भाग म्हणून लवकरच यशस्वीतेच्या संपादनासाठी बॅन्काश्युरन्स चॅनेलला स्थापित करतो.

त्यांच्या नवीन पदभार नेमणूकीविषयी बोलताना श्रीमती विशाखा म्हणाल्या, मी इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्समध्ये परत आल्याने खूप आनंदित आहे. माझा दृढ विश्वास आहे की, ६००० पेक्षा अधिक भागिदार बँक शाखांचा एक वितरण आधार व मजबूत मल्टी चॅनेल धोरणासह कंपनीमध्ये सर्व भारतीय नागरिकांपर्यंत पोहोचण्याची प्रचंड क्षमता आहे. जीवनातील टप्पे व उत्पन्न आधारामधील विविध गरजांच्या पूर्ततेसाठी निर्माण करण्यात आलेल्या समजण्यास सोप्या व सुलभ अशा उत्पादनांसह आम्ही सादर करत असलेल्या प्रत्येक गोष्टीमध्ये आमचे ग्राहक प्रथम स्थानावर असण्यासाठी आमचे प्रयत्न आम्ही सुरुच ठेवू.

इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्स कंपनी ही सर्वात जलद गतीने प्रगती करणाऱ्या इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्स कंपन्यांपैकी एक असून कंपनीने २.७ दशलक्ष आयुष्यांना कव्हर केले आहे. तसेच ३० सप्टेंबर २०१४ नुसार त्यांच्याकडे ७.५०० कोटी रुपये एयूएम आहे.

कंपनीने अलीकडेच एक सामाजिक उपक्रम हॅप्पी इंडियाला दाखल केले, जो रचनात्मक परिवर्तन घडवून आणणाऱ्या कार्यवृत्तीला आणि ११ ते १६ वर्षे वयोगटातील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याला प्रोत्साहन प्रदान करतो. उपक्रम यंग चेंज मेकर्सचा शोध घेण्याचा आणि त्यांच्या आयडियाज फॉर चेंज अंमलात आणण्यासाठी त्यांना समर्थन करण्याचे ध्येय बाळगतो. या उपक्रमामध्ये देशभरातील ३०० पेक्षा अधिक शाळांमधील १५,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी (११ ते १६ वर्षे वयोगटातील) सहभाग घेतला आहे. इंडिया फर्स्टने प्रत्येकाला ५०,००० रुपयांच्या अनुदानासह २५ सर्वोत्कृष्ट आयडियाज फॉर चेंजला समर्थन प्रदान केले आहे.